**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**
**३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५**
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

जा. क्र. NDKSP-१६०२४(११)/६/२०२५-१६/E- २३४७२२८/कृ. अ. दि. ०४/०८/२०२६

**प्रति,**
**१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)**
**२. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)**

**विषय :** नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (टप्पा-२) अंतर्गत सूक्ष्म सिंचन घटकाच्या अंमलबजावणीबाबत.

**संदर्भ :** १. सूक्ष्म सिंचन मार्गदर्शक सूचना क्र. NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT, दि. २८/१०/२०२५.
२. संचालक फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा.क्र/कृआ/फलो-४/प्रकृसिंयो/मो.त./५६/२०, महाराष्ट्र राज्य, पुणे. दिनांक - १४/१/२०२२

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या टप्प्या दोन अंतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. १ नुसार प्रकल्पांतर्गत सूक्ष्म सिंचन हा घटक राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या अडचणींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. लाभार्थ्याने अर्जामध्ये **ठिबक सिंचन इनलाईन प्रणाली** नमूद केलेली असताना प्रत्यक्ष मोका तपासणीमध्ये **ऑनलाईन प्रणाली** आढळल्यास किंवा त्याउलट परिस्थिती असल्यास, प्रत्यक्ष मोका तपासणीमध्ये आढळलेल्या प्रणालीची नोंद करून त्यानुसार कार्यवाही करावी.
२. **पोर्टेबल सिंचन संच** या घटकासाठी अर्जामध्ये नमूद केलेला Coupler Diameter आणि प्रत्यक्ष मोका तपासणीमध्ये आढळलेला Coupler Diameter यामध्ये फरक असल्यास, **मोका तपासणीमध्ये प्रत्यक्ष आढळलेला** Coupler Diameter नोंदवून पूर्वसंमती रक्कम अथवा प्रत्यक्ष मोका तपासणी नुसार देय अनुदान रक्कम यापैकी जी कमी असले अशी अनुदान रक्कम शिफारस करणे बाबतची कार्यवाही करावी.

Digitally signed by
Minal Karanwal
Date: 04-08-2026
12:38:20

**(मिनल करनवाल)**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

**प्रत-** संचालक फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.